# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांच्या नावेच सातबारा



**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

शेतीचा सातबारा उतारा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या विधवा पत्नीच्या नावावर करणे, पंतप्रधान घरकुल योजनेत विधवांना प्राधान्य देणे आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये या महिलांच्या मदतीसाठी विशेष सहाय्य कक्ष सुरू करणे, अशा महत्त्वपूर्ण

## आयोगाच्या शिफारशी स्वीकारून सरकारचे महत्त्वपूर्ण निर्णय

निर्णयांचा अध्यादेश सरकारने जारी केला आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने यासंदर्भात सरकारकडे शिफारशी दिल्या होत्या. या प्रश्नाबाबत 'महाराष्ट्र टाइम्स'ने सातत्याने पाठपुरावा केला होता.

महसूल व वन विभागाने काढलेल्या या आदेशामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांच्या मदतीसाठी सर्वंकष निर्णय घेण्यात आले आहेत. या विधवांसाठी विशेष वारसा नोंदणी हक्क शिबिरे घेऊन त्यांना जमिनीचा हक्क देणे, संपत्तीत वाटा मिळविताना या महिलांना प्राधान्य देणे, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण व त्यांच्या शुल्कासंबंधी विशेष धोरण आखणे, त्यांच्या स्वयंरोजगारासाठी त्यांना शासकीय योजनांमध्ये प्राधान्य देणे, आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये 'मनरेगा' योजना प्राधान्याने राबविणे, अन्न सुरक्षेचा लाभ त्यांना प्राधान्याने देणे अशा निर्णयांचा समावेश आहे. याशिवाय विधवांच्या कुटुंबाना आरोग्यकार्ड देणे आणि अधिकाऱ्यांना विधवा महिलांचे प्रश्न संवेदनशीलपणे हाताळण्यासाठी प्रशिक्षण देणे या निर्णयांचाही त्यात समावेश आहे.

### महिला आयोग समाधानी

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांच्या प्रश्नांची दखल घेऊन आयोगाने मराठवाडा व विदर्भात या महिलांशी संवाद साधला. सुमारे १००० विधवा महिलांशी चर्चा करून त्याआधारे राज्य सरकारला नोव्हेंबर २०१८ मध्ये शिफारशी केल्या होत्या. सरकारच्या या भूमिकेवर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी समाधान व्यक्त केले. या निर्णयामुळे त्यांना जमिनीच्या हक्कापासून वंचित ठेवण्याच्या प्रकाराला आळा बसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांच्या नावानेच सातबारा उतारा

## राज्य महिला आयोगाच्या शिफारशींच्या आधारे घेतला निर्णय

**मुंबई :** शेतीचा सातबारा उतारा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या विधवा पत्नीच्या नावावर करणे, पंतप्रधान घरकुल योजनेत विधवांना प्राधान्य देणे आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये या महिलांच्या मदतीसाठी विशेष सहाय्य कक्ष सुरू करणे, अशा महत्त्वपूर्ण निर्णयांचा समावेश असलेला शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. हे सर्व निर्णय महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने केलेल्या शिफारशींच्या आधारे घेण्यात आले.

महसूल व वन विभागाने काढलेल्या या आदेशामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांच्या मदतीसाठी सर्वंकष निर्णय घेण्यात आले आहेत. या विधवांसाठी विशेष वारसा नोंदणी हक्क शिबिरे घेऊन त्यांना जमिनीचा हक्क देणे, संपत्तीत वाटा मिळवताना या महिलांना प्राधान्य देणे, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण व त्यांच्या शुल्कासंबंधी विशेष धोरण आखणे, त्यांच्या स्वयंरोजगारासाठी त्यांना शासकीय योजनांमध्ये प्राधान्य देणे, आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये 'मनरेगा' योजना प्राधान्याने राबवणे, अन्न सुरक्षेचा लाभ त्यांना प्राधान्याने देणे अशा निर्णयांचा समावेश आहे. याशिवाय विधवांच्या कुटुंबांना हेल्थ कार्ड देणे. काही जिल्ह्यांमध्ये किसान मित्र हेल्पलाईन सुरू करणे आणि अधिकऱ्यांना विधवा महिलांचे प्रश्न संवेदनशीलपणे हाताळण्यासाठी प्रशिक्षण देणे हे निर्णयही घेण्यात आले आहेत.

# आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याची जमीन पत्नीच्या नावे होणार

## महिला आयोगाच्या शिफारशीनंतर राज्य शासनाचा निर्णय

**खास प्रतिनिधी, औरंगाबाद**

**शेतीप्रश्नी हात** टेकल्याने नवऱ्याने जीव दिलेला. आत्महत्या केलेल्या कुटुंबकर्त्याच्या विधवा पत्नीला घरात तशी वागणूक दुय्यमच. मराठवाड्यात गेल्या दहा वर्षांत अशा दुर्दैवी चार हजार ५६५ जणींना मिळालेली मदत तशी तोकडीच. कारण पतीच्या निधनानंतर शेतजमीन विधवा पत्नीला मिळण्याचे प्रमाण नगण्यच, हे चित्र राज्यभर. त्यावर उपाययोजना करण्याची राज्य महिला आयोगाची शिफारस मान्य करीत राज्य शासनाने शेतकरी आत्महत्येनंतर त्यांच्या विधवा पत्नींच्या नावे जमीन करावी तसेच चावडीवाचन करून वारसाहक्क नोंदणी शिबिर घ्यावे असे आदेश मंगळवारी बजावले आहेत.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीच्या नावावर जमीन नसल्याने त्यांना घरकुल मंजुरीस अडचण येत होत्या. या निर्णयामुळे अनेक योजनांचा लाभ देण्याचा मार्ग मोकळा होईल, अशा सूचना असणारा आदेश जारी करण्यात आला आहे.

विदर्भातील आत्महत्यांचे लोण मराठवाड्यात पसरत गेले. गेल्या दहा वर्षांत चार हजार ५६५ शेतकऱ्यांनी नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केल्या. त्यांच्या विधवा पत्नींना एक लाख रुपयांची मदत मिळत असे. त्यातील ७५ हजार रुपये अनामत रक्कम म्हणून आणि उर्वरित रक्कम रोखीने मिळते. पण एकीलाही शासकीय योजनेचा लाभ मिळत नसे. शासकीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांची इच्छा असली तरी त्यांना मदत करता येत नसे. मात्र, आता हा मार्ग मोकळा झाला आहे.

महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी अशा महिलांना कशा प्रकारे मदत करता येईल, याचा अभ्यास करून राज्य शासनाला शिफारशी दिल्या होत्या. त्यात जमिनीचा सातबारा या महिलांच्या नावावर होण्यास प्राधान्य द्यावे, अशी मागणी होती. ती मान्य करण्यात आली आहे. जमीन नावावर नसल्याने प्रधानमंत्री आवास योजना, सामूहिक विवाह सोहळे आदी योजनांमध्ये सहभागी करून घेता येत नसे. नव्या आदेशानुसार हे सारे काम आता महिला व बालकल्याण आणि महसूल विभागाला करता येणार आहे. केवळ एवढेच नाही तर या महिलांना कायदेशीर मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा पातळीवर विशेष कक्ष उघडून त्यांच्या अडचणींचा निपटारा करावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत. या कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शुल्क, आरोग्यप्रश्नी होणारी आर्थिक चणचण याचा निपटारा त्या विभागाने करावा, असे आदेशात म्हटले आहे.

> 'आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवांचे प्रश्न संवेदनशीलतेने हाताळण्याची गरज होती. काही ठिकाणी ते होत. मात्र, त्यास कायदेशीर आधार देण्याची गरज होती. हा विषय प्रशासकीय स्तरावर अधिक काळजीने सोडवावा, यासाठी शिफारशी केल्या होत्या. त्यासाठी अनेक जणींबरोबर संवाद साधला होता. राज्य शासनाने महिला आयोगाच्या शिफारशी मान्य करून घेतलेला निर्णय अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्याबद्दल राज्य शासनाचे आणि मुख्यमंत्र्यांचे आभार मानावेच लागतील.'
>
> **- विजया रहाटकर**, अध्यक्ष, महिला आयोग महाराष्ट्र

सकाळ

# शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींना आधार

हरी तुगावकर : सकाळ वृत्तसेवा

लातूर, ता. २० : शेतकरी आत्महत्येनंतर त्याच्या पत्नीला अनेक अडचणीला सामोरे जावे लागते. कधी कधी तर जगणेच कठीण होते. हे लक्षात घेऊन राज्य महिला आयोगाने अडीच वर्षे अभ्यास करून केलेल्या शिफारशींची राज्य शासनातर्फे अंमलबजावणी केली जाणार आहे. यात महसूल, महिला आणि बालकल्याण, शालेय शिक्षण, आरोग्य, कृषी अशा विविध विभागांकडून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नींना मदतीचा हात पुढे केला जाणार असून, त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न होणार आहे. शिफारशींची तातडीने अंमलबजावणी करावी, असे आदेश दिले गेले आहेत.

**आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नींची स्थिती विदारक असून, त्यावर अडीच वर्षे अभ्यास केला. दोन ठिकाणी कार्यशाळा घेऊन एक हजार शेतकरी विधवांशी व्यक्तिगत संवाद साधून समस्या जाणून घेतल्या. संवेदनशील शासनाने सर्व शिफारशी स्वीकारण्याची ही पहिलीच वेळ आहे. आता काटेकोर अंमलबजावणीसाठी पाठपुरावा राहील.**
– **विजया रहाटकर**, अध्यक्षा, राज्य महिला आयोग

'आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांची सुरक्षितता' या विषयावर राज्य महिला आयोगाने नागपूर, औरंगाबादमध्ये चर्चासत्रे घेतली होती. त्यात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नींशी संवाद साधला. शेतीचा सात-बारा नावावर नसल्याने उद्‌भवणाऱ्या अडचणी, कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न, मुलीचा संसार तुटलाच, तर तिच्या पालनपोषणाचा प्रश्न, कर्ज परतफेडीचे संकट, समाजाचा नकारात्मक दृष्टिकोन, सरकार पातळीवर मदत मिळविताना होणारी कसरत आदी अनेक बाबी या चर्चासत्रांतून पुढे आल्या. त्य
राज्य महिला आयोगाने अभ्
केला. त्यांच्या समस्यांचे निराव
करण्यासाठी काही शिफा
शासनाला केल्या होत्या. त्या शास
स्वीकारल्या असून, अंमलबजा
करण्याचे आदेश नुकतेच काढले.

## शासनाने स्वीकारलेल्या काही शिफारशी

- शेतीचा सातबारा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पत्नीच्या नावे करणे
- विशेष वारसाहक्क नोंदणी शिबिर घेऊन जमिनीचा हक्क मिळवून देणे
- शेतजमीन नावावर करून देऊन प्रधानमंत्री आवास योजनेत घर
- संपत्तीत वाटा मिळविताना प्राधान्य
- मुलीचे लग्न जुळल्यास आर्थिक साह्य
- हेल्थ कार्ड, अन्नसुरक्षा, मुलांचे शिक्षणासंबंधी अडचणी सोडवणे